# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 02482-220120
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : srojalna@mpcb.gov.in

MAHARASHTRA

"Your Service is our Duty"

Sub Regional Office
Plot No. P-3/1 & P-3/2, Near
Hotel Adarsh Palace, Jalna
Aurangabad Road, Add.
MIDC Jalna Tal & Dist.
Jalna- 431203.


No. MPCB/SROJ/445/2022 Date:- 29/03/2022

To,
The Joint Director (WPC),
M.P.C. Board,
Mumbai.

**Sub:-** Minutes of Environmental Public Hearing in respect of proposed sand Belt at Ambad, Mantha, Bhokardan, Jafrabad, Badnapur & Ghansawangi taluka in Jalna District proposed by The District Mining Officer, Collector Office, Jalna, (GoM).

**Ref:-** Environmental Public Hearing conducted on 23/03/2022, 11.30 am at D.P.D.C. Hall, Collector Office Jalna.

Sir,

With reference to above subject matter, the Environmental Public Hearing in respect of proposed sand Belt at Ambad, Mantha, Bhokardan, Jafrabad, Badnapur & Ghansawangi taluka in Jalna District proposed by The District Mining Officer, Collector Office, Jalna, (GoM). is conducted on 23/03/2022, 11.30 am at D.P.D.C. Hall, Collector Office Jalna. The Minutes of said Public Hearing (English & Marathi) along with all necessary details such as Attendance Sheet, Photographs & Video C.D., copy of draft EIA Report, Executive Summary, etc. are enclosed herewith in triplicate.

Submitted for favour of information and further needful, please.

Yours faithfully,

(S. M. Kurmude)
Sub-Regional Officer,
M.P.C. Board, Jalna.

D.A. : As above.

Copy submitted for information to :-
The Regional Officer, MPCB, Aurangabad.

Copy to the Project Proponent :- The District Mining Officer, Collector Office, Jalna, (GoM). for information.

Received
30/03/2022
mining branch

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील अंबड, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, व घनसावंगी तालुक्यातील २५ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/०३/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.......................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील अंबड, मंठा, भोकदरन, जाफ्राबाद, बदनापूर व घनसावंगी तालुक्यातील २५ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/०३/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके** : अध्यक्ष
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, जालना.

२. **श्री. सो. म. कुरमूडे** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

जालना जिल्हयातील अंबड, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर व घनसावंगी तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या २५ वाळुघाटांच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ मार्च २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे आयोजित करण्यात आली होती. सदरील पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी कोविड-१९ नियमावलीचे पूर्णपणे पालन करून घेण्यात आली होती.

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, जालना यांचा जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/०२/२०२२ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी डी. पी. डी. सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे असे नमूद केले. सदर बाबतची जाहीर सुचना दि. २२/०२/२०२२ रोजीच्या दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय अंबड, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर व घनसावंगी.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालूका- अंबड- चांभारवाडी, झोडेगाव, हसनापूर, बढाण खु., घुंगर्डे हदगाव, पिठोरी सिरसगाव, दाढेगाव. तालूका-मंठा- भुवन, देवठाणा-उस्वद १,

देवठाणा-उस्वद २, टाकळखोपा-दूधा, कानडी-उस्वद २, कानडी-लिंबखेडा. तालूका-भोकरदन- मेरखेडा, देऊळगावताड. तालूका-जाफ्राबाद- टाकळी, गारखेडा, आरदखेडा-वरखेडाविरो, बोराखेडी गायकी-गारखेडा. तालूका- बदनापूर- कडेगाव, ढासला, नाणेगाव, सायगाव. तालूका-घनसावंगी- अंतरवाली टेंभी, गुंज सिरसवाडी.

- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन उप-प्रादेशिक कार्यालय जालना येथे तसेच इतर शासकीय कार्यालयामध्ये वाळूघाटाबाबत आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. यानंतर त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार श्री. डॉ. प्रशील शूक्ला, मे. एन्व्हायरो टेक्नो कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाबददल तालूकानिहाय विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश यात होता. जालना जिल्हयातील अंबड, मंठा, भोकदरन, जाफ्राबाद, बदनापूर व घनसावंगी प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला

जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>तालुका अंबड-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | चांभारवाडी | १२, १३, १४ | ३५०x३०x०.६० | १.०५ | २२२६ |
| २ | झोडेगाव | पूर्व बाजू- १३, १७, २०, २२, २३, २४, २५, २७, २८, ३०, ३१<br>पचिम बाजू- ९६, ९५, ९४, ९३, ९२, २६ | ११६०x२०x०.८० | २.३२ | ६५५८ |
| ३ | हसनापूर | ४१, ४९, ५४, ५७, ५९, ६०, ६१, ६२, ७७, २४, २५, २९, ३०, ३५, १४८, १४९ | ६५०x१६x०.५० | १.०४ | १८३७ |
| ४ | बढाण खु. | १०२, १०४, १०५, १०७, ११०, १११ ते ११४, ११९ | ६५०x१७x०.५० | १.१०५ | १९५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | घुंगर्डे हदगाव | २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२८, २२९, २३२, २३५, २३६, २३७ | ५८५x२०x०.५० | १.१७ | २०६७ |
| ६ | पिठोरी सिरसगाव | ४७, ५०, ५१ | ८६५x२२x०.५० | १.९० | ३३६२ |
| ७ | दाढेगाव | १८४, १८१, १७९, १५१ | ६४०x१६x०.५० | १.०२४ | १८०९ |

**तालुका मंठा-**

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भुवन | १ | ३००x३५x१.०० | १.०५ | ३७१० |
| २ | देवठाणा-उस्वद १, | देवठाणा- २७६, २७५, २७३, २७२, २६५, २६४, २६३<br>उस्वद- ३८७ ते ३९१, ४०१ ते ४०३ | ३५०x५०x०.८० | १.७५ | ४९४७ |
| ३ | देवठाणा-उस्वद २,. | देवठाणा- २५३, २५२, २५१, २१८, २१७, २१६, २१५, २१४, २१३, २१२, २१०<br>उस्वद- ४०३, ४०४, ४०५, ४०७, १ ते ४ | ५००x६०x१.०० | ३.०० | १०६०० |
| ४ | टाकळखोपा-दूधा, | टाकळखोपा- २०४, २३५, २३६, २३७, २३८, २४२<br>दूधा- २ ते ११ | ३५०x५०x०.८० | १.७५ | ४९४६ |
| ५ | कानडी-उस्वद २, | कानडी- ४७, ४१, ४०, ३९, २३, २२, २१<br>उस्वद- ३१९ ते ३२३ | ३५०x६०x१.०० | २.१० | ७४२० |
| ६ | कानडी-लिंबखेडा | कानडी- ६७, ६६, ६५, ६४, ६३<br>लिंबखेडा- ९ ते २० | ४००x६०x१.०० | २.४० | ८४८० |

**तालुका भोकरदन.-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेरखेडा | ३०, ३१, ३२, ३३ | २६१x४२x०.५० | १.०९ | १९३६ |
| २ | देऊळगावताड | ६८, ६९, ७०, ७१ | ३६०x३५x०.५० | १.२६ | २२२६ |

**तालुका जाफ्राबाद -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाकळी | १८, १९ | ६१०x१८x०.५० | १.०९८ | १९३९ |
| २ | गारखेडा | १२०, १२१ | ३५०x३०x०.८० | १.०५ | २९६८ |
| ३ | आरदखेडा-वरखेडाविरो | आरदखेडा- १०<br>वरखेडाविरो- १७९ | ४१०x२५x०.५० | १.०२ | १८१० |
| ४ | बोराखेडी गायकी-गारखेडा | गारखेडा- ११<br>बोराखेडी गायकी- १७२ ते १७७, १७० | ७१०x१५x०.८० | १.०६ | ३०१० |

**तालुका बदनापूर -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कडेगाव | १८० ते १८२, १४०, १४१, १४३, १७५, १५५ ते १६५, १७०, १७१, १७३, १७४ | १५००x१५x०.५० | २.२५ | ३९७५ |
| २ | ढासला | ४८४, ४८६, ४७३, ४७४, ४७६, ४७७ | ११००x१०x०.५० | १.१० | १९४३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | नाणेगाव | १७ ते २०, २१, २६, २८ | १०००x१०x०.५० | १.०० | १७६६ |
| ४ | सायगाव | ९२ ते ९४, ८९, ८८, ८५, २८, २९, ३०, ४३ | १०००x३०x०.५० | ३.०० | ५३०० |

<u>**तालुका घनसावंगी -**</u>

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंतरवाली टेंभी | ०४ ते ०६, ९२ ते १०७, ११४, १२९, १३०, १६८, १६९, १७१, १७२, १७६, १८१ | ८००x१५x०.५० | १.२० | २१२० |
| २ | गुंज सिरसवाडी | ४०१, ४०३, सिरसवाडी गावठाण | ८१०x५०x१ | ४.०५ | १४३१० |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

**श्री. प्रमोद शिंदे, रा. सायगाव ता. बदनापूर, जि. जालना** यांनी विचारले की, सदर वाळुघाट हा गावाच्या लगतच असून वाळू वाहतूक करणा-या गाडया हया गावामधील रस्त्यावरून जातील तसेच गावातील नागरीकांना ध्वनीचा व धूळीचा त्रास होईल तर यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेल्या आहेत. यावर पर्यावरणाचे सल्लागार डॉ. प्रशील शूक्ला यांनी सांगितले की, ध्वनी व धूळीच्या प्रदूषणावर उपाययोजना केलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे असतील-

- ट्रॅक्टर व्यतिरिक्त कोणत्याही ध्वनी प्रदूषण करणा-या मशीनरी प्रतिबंधित आहेत.
- ट्रॅक्टर चे एंजिन रेतीघाटावर रेती भरते वेळेस बंद ठेवण्यात येईल.
- वाळू वाहतूक करणा-या वाहनांना वाहतुकीसंबंधी नियमांचे पालन करण्यास बाध्य असतील. तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहन करता येणार नाही. तसेच वाळू वाहन करणा-या वाहनांचे टारपोलिन ने झाकण्याचे प्रस्तावित आहे.
- धूळ निर्माण होवू नये यासाठी पाणी रस्त्यावर सतत शिंपडले जाईल जेणेकरून धूळ उडणार नाही. तसेच नदी किना-यावर व गावातील रस्त्याच्या कडेला झाडे लावण्यात येतील.

श्री. केशव नेटके, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, जालना यांनी उपस्थितांना आश्वासित केले की, वाळू घाटांचा लिलाव नियमांचे पालन करून होईल. तसेच वाळूचे उत्खनन करताना पर्यावरणाची हानी होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेण्यात येईल.

श्री. सो. म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, आणखी कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे अध्यक्ष तसेच उपस्थितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणी अध्यक्ष्यांच्या परवानगीने संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना.

**MINUTES OF THE PUBLIC HEARING WITH RESSPECT TO PROPOSED TWENTY FIVE NOS OF SAND BELTS IN AMBAD , MANTHA, BHOKARDAN, JAFRABAD, BADNAPUR, GHANSAWANGI TALUKAS OF JALNA DISTRICT ON 23/03/2022, 11:30 AM AT. D.P.D.C. HALL, COLLECTOR OFFICE JALNA.**

---

The public hearing in respect of proposed 25 nos Sand Belt in Ambad, Mantha, Bhokardan, Jafrabad, Badnapur, Ghansawangi Talukas of Jalna District, proposed by District Mining Officer, Collector Office, Jalna was conducted on 23[th] March, 2022 at 11:30 a.m. at. D.P.D.C. Hall, Collector Office, Jalna.

The committee members present during the Public Hearing are as under-

1) **Shri. Keshav Netke**
   Additional District Magistrate, Jalna - **Chairman**

2) **Shri. S.M. Kurmude**
   Sub Regional Officer, - **Convener**
   Maharashtra Pollution Control Board,
   Jalna

Shri S. M. Kurmude, Sub Regional Officer, MPCB, Jalna and Convener of the Public Hearing Committee welcomed Hon'ble Chairman and Member of the Public Hearing Committee, Other Government Officials and public who were present for Public Hearing and informed that as per the EIA Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEFCC, GoI) dated 14[th] September, 2006 as amended on 1[st] December, 2009, it is mandatory to conduct prior public hearing to obtained Environment Clearance for certain projects which are covered in the schedule of the said Notification.

Shri S. M. Kurmude, Sub Regional Officer, MPCB, Jalna and Convener of the Public Hearing Committee informed that Project Proponent District Mining Officer, Collector Office, Jalna submitted application for carrying out Public Hearing for proposed 25 nos Sand Belts at Ambad, Mantha, Bhokardan, Jafrabad, Badnapur, Ghansawangi of Jalna District to Sub Regional Office, MPC Board, Jalna on 15/02/2022. Accordingly as per said Notification, 30 days in advance public notice was published in the local newspaper in Daily Sakal in Marathi and in English newspaper in the Times of India on 22/03/2022. The public were asked to send their suggestions/Views/objections regarding the proposed sand Ghats to Sub Regional Office, MPC Board Jalna via email, writing etc. No any suggestion/Views/Objection received to Sub Regional Office, Jalna up till date.

The documents pertaining to the information of above said Sand Ghats was placed at following Government offices for public information and study.

- Collector Office Jalna.

- District Industrial Center Jalna.
- Zilha Parishad Office Jalna.
- Tahsil Offices- Ambad, Mantha, Bhokardan, Jafrabad, Badnapur & Ghansawangi.
- Grampanchayat Office, Chanbharwadi, Zhodegaon, Hasnapur, Badhan Khu., Ghungarde Hadgaon, Pithori Sirasgaon, Dadhegaon of Ambad Taluka. Bhuvan, Devthana Uswad-1, Devthana Uswad-2, Takalkhopa-Dudha, Kanadi-Uswad-, Kanadi-Limbkheda of Mantha Taluka. Merkheda, Deulgaontad of Bhokardan Taluka. Takali, Garkheda, Aaradkheda-Varadkhedaviro, Borakhedi Gayaki-Garkheda of Jafrabad Taluka. Kadegaon, Dhasala, Nanegaon, Saygaon of Badnapur Taluka. Antarwali Tenbhi, Gunj Siraswadi of Ghansawangi Taluka.
- Sub Regional Office, MPC Board, Jalna.
- Regional Office, MPC Board, Aurangabad.
- MPC Board, (HQ), Mumbai.
- Environment Department, Mantralaya, Mumbai.
- Regional Office, Environment Department, Nagpur.

The Convener of the Public Hearing Committee asked to the present public to give their views, suggestions, objections about the above said Sand Belts during the Public Hearing that will be noted and submitted to Environment Department in the proceedings also he requested to the project proponent to give brief presentation about the sand Ghats and majors to be taken during sand excavation. This public hearing is conducted with all precaution measures as per COVID-19 rules.

Accordingly, the Project Representative Dr. Prasheel Shukla of M/s. Enviro Techno Consult Pvt Ltd., Nagpur gave presentation on various aspects about the project which includes the details of project, environmental pollution, plans, devices, control measures to be taken thereof etc. Also mentioned that Instead of drilling and blasting opencast manual method will be adopted in the said mining. The equipments like only spade, ghamela will be used. The sand excavation will be done from dry riverbed only. For control of air pollution, water will be sprinkled regularly on the katcha road used for sand transportation and transportation will be carried out through tractor trolly by covering with tarpaulin. For control of noise pollution, the mining work and sand transportation will be carried out during the daytime only. For control of water pollution, the sand excavation will be carried out in the dry river bed only, the depth of mining pit will be kept above the river water level, the river flow will not be diverted for making the inactive ducts, vehicle washing will be prohibited in the river, care will be taken so as not to generate any effluent from the mining work, facility of mobile toilet will be provided to the workers, excavation will be avoided during the monsoon and flood due to which sand lifted can be recovered, to maintain the land environment, the mining work will not be more than the capacity to which permission is given. Tree plantation will be developed near the river bank and nearby open space, for occupational health safety management, the mining operators will be provided with personal protective equipment's, first-aid kits will be provided at the mining site, care will be taken so as not to cause damage to the environment.

He also gives details of Sand Ghats as below-

## Taluka Ambad-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Chambharwadi | 12, 13, 14 | 350x30x0.60 | 1.05 | 2226 |
| 2 | Zhodegaon | 13,17,20,22,23,24,25,27, 28,30,31 96,95,94,93,92,26 | 1160x20x0.80 | 2.32 | 6558 |
| 3 | Hasnapur | 41,49,54,57,59,60,61,62, 77,24,25,29,30,35,148,14 9 | 650x16x0.50 | 1.04 | 1837 |
| 4 | Badhan Khurd | 102,104,105,107,110,111 To 114, 119 | 650x17x0.50 | 1.105 | 1952 |
| 5 | Ghungarde Hatgaon | 213,214,216,217,218,219 ,228,229,232,235,236,23 7 | 585x20x0.50 | 1.17 | 2067 |
| 6 | Pithori Sirasgaon | 47,50,51 | 865x22x0.50 | 1.90 | 3362 |
| 7 | Dadhegaon | 184,181,179,151 | 640x16x0.50 | 1.024 | 1809 |

## Taluka Mantha-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Bhuvan | 1 | 300x35x1.00 | 1.05 | 3710 |
| 2 | Devthana Uswad 1 | Devthana- 276,275,273,272,265,264 ,263 Uswad-387 To 391, 401 To 403 | 350x50x0.80 | 1.75 | 4947 |
| 3 | Devthana Uswad 2 | Devthana- 253,252,218,127,216,215 ,214,213,212,210 Uswad-403,404,405,407, 1 To 4 | 500x60x1.00 | 3.00 | 10600 |
| 4 | Takalkhopa-Dudha | Takalkhopa- 204,235,236,237,238,242 Dudha-2 To 11 | 350x50x0.80 | 1.75 | 4946 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Kanadi Uswad 2 | Kanadi-47,41,40,39,23,22,21 Uswas-319 To 323 | 350x60x1.00 | 2.10 | 7420 |
| 6 | Kandi-Limbkheda | Kanadi-67,66,65,64,63 Limbkheda-9 To 20 | 400x60x1.00 | 2.40 | 8480 |

## Taluka Bhokardan.-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mekheda | 30,31,32,33 | 261x42x0.50 | 1.09 | 1936 |
| 2 | Deulgaontad | 68,69,70,71 | 360x35x0.50 | 1.26 | 2226 |

## Taluka Jafrabad-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Takali | 18,19 | 610x18x0.50 | 1.098 | 1939 |
| 2 | Garkheda | 120,121 | 350x30x0.80 | 1.05 | 2968 |
| 3 | Aradkheda-Varkhedaviro | Aradkheda-10 Varkhedaviro-179 | 410x25x0.50 | 1.02 | 1810 |
| 4 | Borakhedi-Gayki-Garkheda | Garkheda-11 Borakhedi Gayki-172 To 177,170 | 710x15x0.80 | 1.06 | 3010 |

## Taluka Badnapur-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Kadegaon | 180 To 182, 140,141,143,175,155 To 165,170,171,173,174 | 1500x15x0.50 | 2.25 | 3975 |
| 2 | Dhasla | 484,486,473,474,476,477 | 1100x10x0.50 | 1.10 | 1943 |
| 3 | Nanegaon | 17 To 20,21,26,28 | 1000x10x0.50 | 1.00 | 1766 |
| 4 | Saygaon | 92 To 94,89,88,85,28,29,30,43 | 1000x30x0.50 | 3.00 | 5300 |

## Taluka Ghansawangi-

| Sr. No. | Name of Sand belt | Gat No. | Area (mtrs) LxWxD | Area (Hect) | Sand (Brass) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Antawali Tenbhi | 04 To 06,92 To 107,114,129,130,168,169 | 800x15x0.50 | 1.20 | 2120 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ,171172,176,181 | | | |
| 2 | Siraswadi | 401,403, Sirswadi Gavthan | 810x50x1 | 4.05 | 14310 |

The above information is recorded and included in brief in the minutes.

Shri S. M. Kurmude, Sub Regional Officer, MPCB, Jalna and Convener of the Public Hearing Committee requested to the present public to give their any views, Objections/Suggestions for which reply will be given through the project proponent. Before asking any questions requested to give their name & name of village.

During the Public Hearing Following Views/Suggestions/Objection raised by public present during public hearing-

**Shri. Pramod Shinde, Saygaon, Tal. Badnapur, Dist. Jalna.**

He said that, He said that the sand Ghat are very close to the village and the sand transport vehicles will pass through the village roads.The citizens of the village will be disturbed by noise and dust, what measures have been taken by the government for this. Environmental consultant Dr. Prashil Shukla said that, the measures taken on noise and dust pollution as follows-

- No Vehicle other than tractor will be allowed at the site.
- The engine of the tractor will be shut down at the time of filling sand on the sand Ghats.
- Vehicles transporting sand will be required to comply with traffic rules. Also, transportation of sand will be restricted to the prescribed capacity of the vehicle. Also proposed to cover sand vehicles with tarpaulins.
- Water will be sprinkled continuously on the road to prevent dust emission.
- Also, trees will be planted along the river bank and along the village road.

Shri. Keshav Netake, Additional District Magistrate assured the present public that, the auction of sand ghats shall be carried out after complying with all Environmental Rules and regulations. Also, every possible effort will be made to ensure that the environment is not harmed while excavating sand.

Shri S. M. Kurmude, Convener of the Public Hearing Committee, asked the participants to raise suggestions, objections if any. There was no response. the Convener of said hearing gave vote of thanks to the concerned and with the permission of the Chairman of said public hearing, declared that the working of said hearing is concluded.

The meeting ended extending thanks to the Chair.

**(S.M. Kurmude)**
Convener
And
Sub-Regional Officer, MPCB, Jalna

**(Keshav Netake)**
Chairman
And
Additional District Magistrate, Jalna